# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.12.2025** **वारःगुरुवार**

1. जिल्हा परिषद आरोग्य विभागातल्या कंत्राटी तत्त्वावरील आरोग्य सेविकांना नियमित करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
2. नगराध्यक्षांना सदस्यत्व आणि मतदानाचा अधिकार.
3. अरवली पर्वतरांगेतील खनिजांच्या नविन खाणपट्ट्यांवर केंद्राद्वारे बंदी
4. उपग्रह ब्लुबर्ड ब्लॉक टूद्वारे विनामनोरा संपर्क व्यवस्था.
5. रत्नागिरी तालुक्यात एकाच दिवसात 95 ग्रामपंचायतींमध्ये 425 बंधारे आणि
6. कॉंग्रेसचे जेष्ठ नेते सुरुपसिंग नाईक यांचं निधन.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय- राज्य</u>**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कंत्राटी तत्त्वावरकार्यरत असलेल्या आरोग्य सेविकांना नियमित करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत काल घेण्यात आला आहे. याशिवाय नगरपरिषदा आणि नगर पंचायत निवडणुकीत थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांना संबंधित सभागृहाचं सदस्यत्व देण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. त्यांना मतदानाचा अधिकारही दिला जाणार आहे. यासंदर्भातला अध्यादेश काढण्यासाठी मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

जिल्हा कर्मयोगी कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील सरपंचांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णयदेखील या बैठकीत घेण्यात आला. यासाठी भारतीय गुणवत्ता परिषद मित्रा आणि व्हीएसटीफ फाउंडेशन यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार राज्यातील सुमारे 20 हजार सरपंचांना प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

**<u>अरवली पर्वत</u>**

दिल्ली ते गुजरातपर्यंत पसरलेल्या संपूर्ण अरवली पर्वतरांगेचे अवैध खाणकामापासून संरक्षण करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत, केंद्राने राज्यांना अरवली पर्वतरांगेत कोणत्याही नवीन खाणपट्ट्या मंजूर करण्यावर संपूर्ण बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने एका निवेदनात पर्वतरांगेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी ही बंदी संपूर्ण अरवली प्रदेशात समान रीतीने लागू होणार असल्याचं म्हटलं आहे.

दरम्यान कॉंग्रेससह काही राजकीय पक्षअरवली पर्वतांवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत गैरसमज पसरवत असून ते जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा विपर्यास करत आहेत आणि आपल्या स्वार्थासाठी त्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करत आहेत अशी टीका केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केली आहे.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल अरवली प्रदेशातील अवैध खाणकामावर बंदी घालण्याबाबत असून हा प्रदेश महत्त्वाच्या खनिजांचा प्रमुख स्रोत आहे. तसंच तो देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक असून केंद्र सरकार त्याच्या संवर्धनासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. अरवली प्रदेशातील पडीक जमिनींवर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केलं जात असल्याचंही यादव यांनी म्हटलं आहे.

**<u>इस्रो</u>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं काल अंतराळात पाठविलेला अमेरिकन दळणवळण उपग्रह ब्लु बर्ड ब्लॉक टू हा कमी उंचीच्या पृथ्वी कक्षेत तैनात केला जाणारा सर्वात मोठा व्यावसायिक दळणवळण उपग्रह आहे. तसंच, भारतीय भूमीवरून LVM3 द्वारे प्रक्षेपित केला जाणारा हा सर्वात जड पेलोड आहे. पुढील पिढीच्या दळणवळण उपग्रहांचा एक भाग असलेला ब्लूबर्ड थेट सामान्य मोबाईल स्मार्टफोनला अंतराळ-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड जोडणी प्रदान करेल. यामुळं मनोरा आणि फायबरशिवाय थेट मोबाईल सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

**नाताळ**

देशभरात ख्रिसमसचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या निमित्तानं विविध ठिकाणी गिरीजाघरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. बाजारपेठादेखील ख्रिसमसच्या वस्तूंनी फुलल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ख्रिसमसनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ख्रिसमस हा आनंद आणि उत्साहाचा सण आहे, प्रेम आणि करुणेचा संदेश देतो तसच हा सण मानवतेच्या कल्याणासाठी प्रभू येशू ख्रिस्तांनी केलेल्या त्यागाची सर्वांना आठवण करून देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुंबई शेअर बाजार तसंच राष्ट्रीय शेअर बाजार आज बंद राहणार आहेत.

**जीरामजी-हिंगोली**

केंद्र सरकारने नुकत्याच मांडलेल्या नव्या विकसित भारत जी राम जी विधेयकामुळे शेतमजूरांना सुरक्षित आणि सन्मानजनक उपजीविका मिळण्यास मदत होणार आहे. या संदर्भात हिंगोली मधल्या तोंडापूर इथल्या कृषि विज्ञान केंद्रातील वरिष्ठ संशोधक डॉ. पी. पी. शेळके या विधेयकामुळे होणाऱ्या लाभांबाबत आकाशवाणीशी बोलताना म्हणाले....

**आता फक्त माती उकरण्याचे काम होणार नाही तर ग्रामपंचायती स्वतः विकसित ग्रामपंचायत आराखडा तयार करतील आणि या पैशातून शाळेच्या इमारती अंगणवाड्या पक्के रस्ते कटारी पूल इत्यादी कामे निवडून बांधण्यात येतील. ज्या पंचायती मागे आहेत, त्यांना अधिक निधी देऊ न्याय देण्यात येईल. शेती आणि जलसंधारणाला जोड सुद्धा या योजनेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. यातून शेततळी विहिरी आणि जलसंधारणाची कामे केल्या जातील, ज्यामुळे जमिनीच्या पाण्याची पातळी वाढेल आणि पूर रोखण्यासाठी संरक्षक भिंती आणि पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था सुद्धा निर्माण करता येईल. शेतकरी मित्रांनो आपली मोठी अडचण असते ती म्हणजे पेरणी किंवा कापणीच्या वेळेस मजूर मिळत नाहीत, या कायद्यात मात्र यासाठी सुवर्णमध्य साधण्यात आलेलं आहे. जेव्हा शेतीची कामे ऐन भरात असतील त्यावेळेस ही योजना काही काळासाठी त्या त्या राज्यामध्ये बंद राहणार जेणेकरून मजूर शेतीच्या कामासाठी उपलब्ध होतील राज्य सरकार आपल्या हंगामानुसार हे दिवस ठरवू शकेल.**

**ठाकरे-युती**

आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने युतीची घोषणा केली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत मुंबई निवडणुकांसाठी युती करत असल्याचे काल जाहीर केले. युती झाली असली तरी आमच्या जागावाटपाबाबत माहिती त्यांनी जाहीर केली नाही. नाशिक महापालिकेसाठी युती झाली असून उर्वरित महापालिकांच्या संदर्भात एक-दोन दिवसांत शिक्कामोर्तब होईल, असं सांगताना उद्धवठाकरे म्हणाले की मराठी माणूस आणि मुंबईच्या रक्षणासाठी ही युती झाली आहे. काँग्रेसनं मुंबई महापालिकेच्या निवडणुका स्वतंत्ररित्या लढवण्याची घोषणा केली असून शरद पवार यांच्यासोबत वाटाघाटी सुरू असल्याची माहितीही उद्धव ठाकरे यांनी दिली. दरम्यान या राजकीय युतीचा फार काही परिणाम होणार नाही. केवळ राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी ही युती झाल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

**बंधारे-रत्नागिरी**

उन्हाळ्यातल्या पाणी टंचाईची तीव्रता कमी होण्याच्या उद्देशाने रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या काही दिवसांमध्ये लोकसहभागातून बंधारे बांधण्याच्या मोहिमेवर प्रशासनाने लक्ष केंद्रित केलं आहे. ऐकुयात याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**प्रचंड पाऊस पडत असला, तरी उन्हाळ्याच्या अखेरीला पाणीटंचाई सोसण्याची वेळ रत्नागिरीतल्या अनेक गावांवर येते. त्या टंचाईची तीव्रता कमी व्हावी, विहिरींच्या पाणीपातळीत वाढ व्हावी, शेतीसह पशू-पक्ष्यांना पाणी मिळावं याकरिता लोकसहभागातून बंधारे बांधण्याच्या मोहिमेवर सध्या जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रित केलंय. मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांच्या संकल्पनेतून ही मोहीम राबवण्यात येतेय. त्याअंतर्गत रत्नागिरी तालुक्यात एकाच दिवसात 95 ग्रामपंचायतींमध्ये 425 बंधारे बांधण्यात आले. त्यात 185 कच्च्या, 193 वनराई आणि 47 विजय बंधाऱ्यांचा समावेश होता, अशी माहिती गटविकास अधिकारी चेतन शेळके यांनी दिली. काही दिवसांमध्ये ही संख्या 500 चा आकडा ओलांडेल, असंही ते म्हणाले. गेल्या आठवड्यात चिपळूण तालुक्यातल्या 130 ग्रामपंचायतींमध्ये एका दिवसात 527 बंधारे बांधण्यात आले. चिपळुणात आतापर्यंत आठशे बंधारे झाले असून, एक हजार बंधाऱ्यांचं उद्दिष्ट असल्याचं गटविकास अधिकारी उमा घारगे-पाटील यांनी सांगितलं. मंडणगड तालुक्यातही आतापर्यंत 252 बंधारे बांधून झाले आहेत. ग्रामपंचायत पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांपासून अंगणवाडी**

**सेविका, बचत गटातल्या महिला, विद्यार्थी यांच्यासह ग्रामस्थांच्या सहभागातून हे काम केलं जातंय. या सर्वांच्या भगीरथ प्रयत्नांतून यंदाचा उन्हाळा सुकर होण्यास मदत होणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**नवी मुंबई विमानतळ**

अत्याधुनिक ग्रीनफिल्ड विमानतळ म्हणून नावजले गेलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर आज पहिलं प्रवासी विमान उतरणार आहे. थोड्याच वेळात म्हणजे 8 वाजता इंडिगोचे विमान बंगळूरू येथून दाखल होणार आहे. यासोबतच मालवाहतूक सेवा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी काल सिडको भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत दिली.15 जानेवारी पर्यंत दररोज 48 विमानं उड्डाण करणार आहेत.

**वाढवण-पालघर**

प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील मच्छीमारांचे सखोल आणि शास्त्रशुद्ध सर्वेक्षण करण्याबाबत जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वेक्षणाचे महत्त्व, त्याची आवश्यकता आणि धोरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**सत्कार-धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर तालुक्यातील एकलव्य आश्रम शाळा यमगरवाडी सेवा संकुल उभारणीसाठी मागील 32 वर्षांपासून योगदान देणाऱ्या ज्येष्ठ संघ स्वयंसेवकांचा सत्कार आज होणार आहे. यात केंद्रीय भटक्या विमुक्त बोर्डाचे सदस्य भिकुजी इदाते, गिरीश प्रभुणे, रमेश पतंगे, अशोक कुकडे, यांच्यासोबत अन्य संघ कार्यकर्त्यांचा सत्कार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी, आणि अनिल भालेराव प्रांत संघचालक यांच्या हस्ते होत आहे.

**निधन-नंदुरबार**

कॉंग्रेसचे जेष्ठ नेते सुरुपसिंग नाईक यांचे काल वृद्धापकाळाने काल निधन झाले. ते 88 वर्षांचे होते. महाराष्ट्राच्या मंत्रीमडळात अनेक खात्यांचे कॅबीनेट मंत्रीपद भुषवलेले सुरुपसिंग नाईक 1985 पासून सातत्याने विधानसभेत निवडून आले. आपल्यातील शैक्षणिक दृष्टी जोपासत त्यांनी आदिवासी सेवा सहाय्यक आणि शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून नवापुर तालुक्यात मोठ्या शिक्षण संस्थेचं जाळं विणलं. सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट ठेवत त्यांनी आदिवासी सहकारी साखर कारखाना डोकारेची पायाभरणी केली. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातल्या अनेक योजना आणि विकास कांमामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.